# —:— दौंड लोहमार्ग पोलीसांची कामगिरी —:—

SRPF ग्रुप नंबर ७ दौंड येथे भरतीसाठी आलेला उमेदवार याची दि.०७/०१/२०२३ रोजी दौंड रेल्वे स्टेशन परिसरात बॅग हरवली होती. त्यामधे त्याची शैक्षणिक तसेच भरतीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे होती. उमेदवाराने पोलीस ठाणेत येवुन हकिकत सांगितली असता दौंड लोहमार्ग पोलीस ठाणे येथे कर्तव्यावर असणारे ASI खरपडे, पोहवा १०७ पवार, मपोना १३७७ गोयकर, मपोशि १३३७ कांबळे यांनी याची तात्काळ दखल घेवुन रेल्वे स्टेशन परिसरातील मुलांचे मदतीने दौंड रेल्वे स्टेशन परिसरात शोध घेवुन बॅगेचा तात्काळ शोध घेतला व सदर उमेदवाराची सर्व कागदपत्रे शोधून दिली. यावेळी त्यांना खूपच आनंद झाला नमुद उमेदवार यांनी व त्यांचे नातेवाईकांनी पोलीसांचे खुप आभार मानून धन्यवाद दिले.

कागदपत्राची बॅग शोधणासाठी पोलीसांना मदत करणाऱ्या मुलांना नमुद पोलीस पथकाने खाऊ साठी रोख रक्कम बक्षीस देवून त्यांचे धन्यवाद मानले.

